

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटुसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

तमाम जनतेस दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा ! www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ९५ वा | रविवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

शेतकऱ्यांनी पराभवाची धूळ चारली, तर शासन नियुक्त्यांचा राजकीय घाट कशासाठी?

गोकुळमध्ये पाच शासन नियुक्त संचालक नेमण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेवर सवाल

२५ विद्यमान सदस्यांतूनच कोरम पूर्ण करण्याचा पर्याय असताना राजकीय हस्तक्षेप कशासाठी ?

कोल्हापूर (कटूसत्य वृत्त) : स्वतः कायद्याचे अभ्यासक आणि वकील असलेल्या मुख्यमंत्र्यांनी गोकुळ दूध संघातील कोरम पूर्ण करण्यासाठी पाच शासन नियुक्त संचालक नेमण्याबाबत केलेले विधान अत्यंत दुर्दैवी आणि लोकशाही मूल्यांना धक्का देणारे आहे. गोकुळ ही जिल्ह्यापुरती मर्यादित संस्था असल्याचे सांगितले जात असताना, तिच्या कारभारात अशा प्रकारे शासन नियुक्त्यांचा हस्तक्षेप करण्याची गरजच काय, असा थेट सवाल विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे.

गोकुळमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या २५ संचालकांच्या माध्यमातूनच कोरम पूर्ण होऊ शकतो. त्यामुळे कोरमचा प्रश्न सोडवण्यासाठी नव्याने पाच शासन नियुक्त संचालक आणण्याची आवश्यकता काय? हा खरा प्रश्न आहे. सहकारी संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता आणि लोकशाही प्रक्रिया जपायची असेल, तर कोरमअभावी बैठक होऊ न शकल्यास ती तहकूब करून पुन्हा बैठक बोलावण्याची तरतूद करता आली असती. आवश्यक कायदेशीर तरतुदींच्या अधीन



राहून अशा पुनर्बोलावलेल्या बैठकीसाठी कोरमसंदर्भात स्वतंत्र नियम करण्याचा पर्यायही विचारात घेता आला असता. मात्र, त्याऐवजी थेट पाच शासन नियुक्त संचालक नेमण्याचा विचार पुढे आणणे म्हणजे संस्थेच्या कारभारात राजकीय हस्तक्षेपाला वाव देण्यासारखे आहे. असे मत कायदा तज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

वास्तविक, गोकुळच्या निवडणुकीपूर्वी महायुतीच्या नेत्यांनी २५ विरुद्ध शून्य अशा विजयाच्या वल्गना केल्या होत्या. मात्र, शेतकऱ्यांनी मतदानातून महायुतीला नाकारले. ठरावधारकांनीही समविचारी आघाडीच्या बाजूने कौल दिल्याने महायुतीला पराभवाचा सामना करावा लागला. जनतेचा आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांचा कौल स्वीकारून आत्मपरीक्षण करण्याऐवजी आता शासन नियुक्त संचालकांच्या माध्यमातून गोकुळमधील राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप होत आहे. शेतकरी व सामान्य जनतेकडून समाज माध्यमातून केला जात आहे.

लोकशाहीत निवडणूक ही केवळ सत्ता मिळवण्याची प्रक्रिया नसते, तर मतदारांनी दिलेला कौल स्वीकारण्याची जबाबदारीही असते. शेतकऱ्यांनी नाकारलेल्या राजकीय नेतृत्वाला शासन नियुक्त्यांच्या माध्यमातून पुन्हा संस्थेच्या सत्ताकारणात स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न झाला, तर तो सहकार क्षेत्राच्या स्वायत्ततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरेल.

मुख्यमंत्री महोदय, गोकुळ ही केवळ राजकीय प्रतिष्ठेची संस्था नाही; ती दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टातून उभी राहिलेली संस्था आहे. तिच्या कारभारात पारदर्शकता आणणे, शेतकऱ्यांचे हित जपणे आणि सहकारातील लोकशाही अबाधित ठेवणे ही शासनाची जबाबदारी आहे. निवडणुकीत पराभव झाल्यानंतर नियुक्त्यांच्या माध्यमातून राजकीय ताकद वाढवण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा फटका भविष्यात महायुतीलाच बसू शकतो.

शेवटी प्रश्न एवढाच आहे की, शेतकऱ्यांनी दिलेला कौल मान्य करायचा की शासन नियुक्त्यांच्या जोरावर तो बदलण्याचा प्रयत्न करायचा? सहकार वाचवायचा असेल, तर राजकारणापेक्षा शेतकऱ्यांच्या मताचा सन्मान करणे अधिक महत्त्वाचे आहे.

सोलापूरात राजकीय वातावरण तापलं;

भाजप-काँग्रेस नेत्यांमध्ये कलगीतुरा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापुरात काँग्रेस आणि भाजपमधील राजकीय संघषार्मुळं वातावरण चांगलच गरम झाल्याचं पाहायला मिळत आहे. राजकीय नेते ऐकमेकांवर वैयक्तिक आरोप-प्रत्यारोप करत आहेत. भाजपचे आमदार देवेंद्र कोठे आणि काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्यात जोरदार बाचाबाची झाल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

काँग्रेस शहराध्यक्षांच्या घराबाहेर मध्यरात्री हा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे राजकारणात खळबळ उडाली आहे. सोलापुरातील भाजप-काँग्रेस नेत्यामधील वादाच्या प्रकरणात आतापर्यंत एकूण 3 गुन्हे दाखल झाले आहेत.

भाजप आमदार देवेंद्र कोठे समर्थकावर 2 तर काँग्रेस कार्यकर्त्यांच्या विरोधात 1 गुन्हा नोंद झाला आहे. आमदार देवेंद्र कोठे विरोधात विना परवानगी आंदोलन करत बेकायदेशीर जमाव जमवल्याप्रकरणी काँग्रेस कार्यकर्त्यावर गुन्हा नोंद झाला आहे. काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौर आरिफ शेख, तिरुपती परकीपंडला यांच्यासह 13 कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. तर आंदोलनात सहभागी असलेल्या काँग्रेसच्या सोशल मीडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला यांना धमकी दिल्या प्रकरणी आमदार देवेंद्र कोठे समर्थकावर गुन्हा दाखल झाला आहे.

पवन खांडेकर, आकाश मुदगल, ओम धुत्तरगावकर या तिघांविरोधात धमकी दिल्याप्रकरणी अदखलपात्र गुन्हा नोंद झाला आहे. तर ठाकरे गटाचे कार्यकर्ते निरंजन बोद्धूल यांनी आमदार देवेंद्र कोठे यांच्या विरोधात सोशल मीडियावर पोस्ट केल्याने त्यांना मारहाण करण्यात आली आहे. या प्रकरणी आमदार देवेंद्र कोठे यांचे समर्थक नागेश म्हेत्रे यांच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



खासदार प्रणिती शिंदे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर केली होती टीका

दरम्यान, या वादामागे खासदार प्रणिती शिंदे आणि भाजप आमदार देवेंद्र कोठे यांच्यातील शाब्दिक संघर्ष कारणीभूत असल्याचे सांगितले जात आहे. काही दिवसांपूर्वी खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूरचे पालकमंत्री गोरे यांच्यावर टीका करताना त्यांना 'लबाड लांडगा' अशी उपमा दिली होती. या टीकेला प्रत्युत्तर देताना भाजप आमदार देवेंद्र कोठे यांनी प्रणिती शिंदे यांच्याबाबत आक्षेपार्ह शब्दांचा वापर केल्याचा आरोप आहे. त्यांनी शिंदे यांना 'महागाढव' असे म्हटल्याने राजकीय वातावरण तापले आहे. चेतन नरोटे यांनी आमदार देवेंद्र कोठे यांच्याविरोधात केलेल्या आंदोलनानंतर, भाजप कार्यकर्त्यांनी काँग्रेस भवनासमोर जोरदार निदर्शने केली. यावेळी देवेंद्र कोठे यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करत घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनानंतर पोलिसांनी काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे.

डीसीसी निवडणूक : सात नेत्यांची झाली सुनावणी



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूक प्रक्रियेतील अर्ज छाननीत निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मुकूंद पवार यांनी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, माजी आ. संजयमामा शिंदे यांच्यासह सात नेत्यांना अपात्र केले होते. त्या निर्णय विरोधात त्या नेत्यांनी पुणे विभागीय सहनिबंधक दिग्विजय अहिरे यांच्यासमोर गुरुवारी (दि.६) सुनावणी झाली. यावेळी ॲड. उमेश मराठे आणि ॲड. प्रमोद पाटील यांनी कलम ८८ चौकशी विषय युक्तीवाद केला. तर कलम ११० अ विषयी ॲड. अभिजित कुलकर्णी, ॲड. धनंजय कुर्जेकर (पान 2 वर..)



सोलापूर जिल्ह्यात ऊसदराची कोंडी कायम;

२४ कारखान्यांकडून दर जाहीर नाही

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- कोल्हापूर, सांगली, सातारा यांसह इतर जिल्ह्यांतील साखर कारखानदारांनी ऊसदर जाहीर केले असताना सोलापूर जिल्ह्यात मात्र ऊसदराची कोंडी कायम आहे. जिल्ह्यातील सात ते आठ साखर कारखान्यांनी प्रतिटन ३ हजार १५० रुपये दर जाहीर केला आहे.

मात्र, अद्याप २४ साखर




कारखान्यांनी दर जाहीर केलेला नाही. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांतील साखर कारखानदारांनी गाळप होणाऱ्या उसाचा दर जाहीर केला आहे. त्या तुलनेत सोलापूर जिल्ह्यातील मोजक्याच कारखान्यांनी दर जाहीर केल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी लवकरात लवकर प्रतिटन ३ हजार ५०० रुपये ऊसदर जाहीर करावा. अन्यथा सुरू झालेले सर्व साखर कारखाने बंद पाडण्यात येतील, असा इशारा रयत क्रांती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार यांनी दिला आहे.



शहरात अवैध सावकारी विरोधात धडक कारवाई



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहरात विनापरवाना व बेकायदेशीररीत्या सुरू असलेल्या अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी सहकार विभागाने मोठी कारवाई हाती घेतली असून, एका अवैध सावकारावर गुन्हा दाखल केल्याची माहिती शहर उपनिबंधक उमेश पवार यांनी दिली आहे.

शहरातील वज्रेश्वर नगर भागात अवैध सावकारी करणाऱ्यावर छापा टाकण्यात आला आहे. तेथे नागरिकांकडून घेतलेले कोरे चेक, कोरे बॉन्डपेपर आणि इसारा पावतीसह अनेक संशयास्पद दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत.

अंबिका नगर येथील रहिवासी जय लक्ष्मण पतंगे यांनी दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने सहकार विभागाने दोन विशेष पथके तयार केली होती. यातील एका पथकाने कर्णिक नगर, वज्रेश्वर नगर येथील युवराज अशोक जानकर यांच्या घराची झडती घेतली. या झडतीत त्यांच्याकडे लोकांकडून घेतलेले कोरे चेक, कोरे बॉन्ड, अनामत ठेव पावती, इसारा पावती, करारपत्र, खरेदीखत आणि वाहन खरेदी पावती यांसारखे महत्त्वाचे कागदपत्रे आढळून आले.

या प्रकरणी सहकार अधिकारी राजू नरहरी ढोणे यांच्या फियार्दीवरून युवराज अशोक जानकर यांच्यावर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम ३९ व ४१ अन्वये एम.आय.डी.सी. पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, दुसऱ्या पथकाने केलेल्या कारवाईत निलेश चंद्रकांत हरे यांच्या घरी कोणतीही बेकायदेशीर कागदपत्रे आढळली नाहीत.

अवैध सावकारांची करा तक्रार

सोलापूर शहरात अवैध सावकारीसंदर्भात काही तक्रारी किंवा माहिती असल्यास नागरिकांनी न घाबरता तातडीने उपनिबंधक, सहकारी संस्था सोलापूर शहर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन शहर उपनिबंधक उमेश पवार यांनी केले आहे.

संपादकीय

विवेकदीप उजळी...

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा उत्सव! घराघरांत पणत्यांची आरास, आकाशकंदिलांची रोषणाई, रांगोळ्यांचे रंग, फराळाचा सुगंध आणि आनंदाचे वातावरण... सर्वत्र उत्साहाचे चैतन्य पसरलेले असते. बाजारपेठा ग्राहकांच्या गर्दीने फुललेल्या असतात, दुकानांची सजावट लक्ष वेधून घेते आणि फटाक्यांच्या आतषबाजीने आसमंत उजळून निघतो. दिवाळीचा हा झगमगाट मनाला आनंद देणारा असला, तरी या प्रकाशोत्सवाच्या काळात समाजातील काही अंधारे कोपरे विसरून चालणार नाहीत.

यंदा महाराष्ट्रासमोर दुष्काळ आणि पाणीटंचाईचे गंभीर संकट उभे आहे. राज्यातील अनेक भागांत पाण्याची चिंता दिवसेंदिवस गडद होत आहे. शेतकरी चिंतेत आहे, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न बिकट बनला आहे आणि ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचे जगणे संघर्षमय झाले आहे. अशा परिस्थितीत दिवाळी साजरी करताना आपल्या आनंदाच्या प्रकाशाबरोबरच दुसऱ्याच्या आयुष्यातील अंधाराची जाणीव ठेवणे, हीच खरी सामाजिक जबाबदारी ठरते.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत म्हटले आहे–

मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेक दीप उजळी ।
तै योगिया पाहे दिवाळी । निरंतर ॥

या ओवीतून ज्ञानदेवांनी दिवाळीचा खरा अर्थ अत्यंत समर्पक शब्दांत सांगितला आहे. दिव्याच्या ज्योतीवर जमलेली काजळी काढून टाकली की त्याचा प्रकाश अधिक स्वच्छ आणि तेजस्वी होतो. त्याचप्रमाणे मनावर साचलेली अविवेकाची काजळी दूर करून विवेकाचा दीप प्रज्वलित करणे, हीच खरी दिवाळी आहे. बाहेरचा अंधार एका दिव्याने दूर होऊ शकतो; मात्र मनातील अज्ञान, द्वेष, स्वार्थ आणि असंवेदनशीलतेचा अंधार दूर करण्यासाठी विवेकाची ज्योत अखंड तेवत राहावी लागते.

आजच्या समाजात ज्ञानाची, माहितीची आणि बोलक्या विद्वत्तेची कमतरता नाही. परंतु विचार आणि कृती यांच्यातील अंतर कमी करणाऱ्या व्यक्ती मात्र दुर्मिळ होत चालल्या आहेत. संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे–

बोले तैसा चाले । त्याची वंदीन पाऊले ॥

या शब्दांतील साधेपणातच समाजजीवनाचे मोठे तत्त्व दडलेले आहे. बोलणे आणि वागणे यांत एकरूपता असली, तरच व्यक्तीचा शब्द समाजासाठी प्रेरणादायी ठरतो. आज समाजाला उपदेश करणाऱ्या व्यक्तींपेक्षा स्वतःच्या आचरणातून आदर्श निर्माण करणाऱ्या व्यक्तींची अधिक गरज आहे.

ज्ञानदेवांनी भाविक आणि ईश्वर यांच्या अद्वैताचे वर्णन करताना दिवा आणि प्रकाशाचा सुंदर दृष्टांत दिला आहे–

दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाडु जैसा ।
तो माझां ठायी तैसा । मी तयामाजीं ॥

दिवा आणि त्याचा प्रकाश वेगळे करता येत नाहीत. त्याचप्रमाणे विचार आणि कृती यांच्यातील अंतर संपले, तर व्यक्तीचे जीवन अधिक अर्थपूर्ण होते. समाजात अशा सदाचरणी व्यक्तींची संख्या वाढेल, तसतसे समाजाचे नैतिक बळही अधिक दृढ होईल. दांभिकता, स्वार्थ आणि केवळ शब्दांच्या पांडित्याने निर्माण झालेला अंधार दूर करण्यासाठी कृतीच्या प्रकाशाची गरज आहे.

दिवाळीचा उत्सव साजरा व्हायलाच हवा. रोषणाई, फराळ, नवीन वस्तूंची खरेदी आणि कुटुंबासोबतचा आनंद हे जीवनातील उत्साह टिकवून ठेवणारे क्षण आहेत. मात्र हा आनंद साजरा करताना ज्यांच्या घरापर्यंत दिवाळीचा प्रकाश पोहोचलेला नाही, त्यांची आठवण ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्या क्षमतेनुसार एखाद्या गरजूच्या आयुष्यात आनंदाचा क्षण निर्माण करता आला, एखाद्या कुटुंबाच्या अडचणी कमी करता आल्या, तर त्या कृतीतूनच दिवाळीचा खरा प्रकाश अनुभवता येईल.

दिव्याचे बटन दाबले की बाहेरचा अंधार दूर होतो. पण मनातील अंधार दूर करण्यासाठी कोणते बटन दाबायचे? याचे उत्तर आपल्या संवेदनशीलतेत, विवेकात आणि माणुसकीत दडलेले आहे. दिवाळी हा केवळ बाह्य प्रकाशाचा उत्सव नाही; तो अंतःकरण उजळविण्याचा संस्कार आहे.

ज्ञानदेव म्हणतात–

दिपांच्या कोडी जैसे । एकची तेज सरिसे ।

दिवे कितीही असले, तरी त्यांच्या प्रकाशाचे तेज सर्वांसाठी समान असते. दिवाळीचा हाच संदेश आपण आपल्या जीवनात उतरविण्याची गरज आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत माणुसकीचा प्रकाश पोहोचला, प्रत्येकाच्या दुःखात सहभागी होण्याची संवेदना जागी झाली आणि विवेकाची ज्योत मनामनांत निरंतर तेवत राहिली, तरच हा प्रकाशोत्सव खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल.

यंदाची दिवाळी केवळ घराची रोषणाई करणारी नव्हे, तर मनातील अविवेकाची काजळी दूर करून विवेकाचा दीप प्रज्वलित करणारी ठरो, हीच मनःपूर्वक सदिच्छा!

मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण आणि उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करतो. मात्र, या सर्व सणांमध्ये दिवाळी या सणाचे स्थान विशेष आहे. दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा, उत्साहाचा आणि मांगल्याचा सण म्हणून ओळखला जातो. सलग पाच दिवस साजरा होणारा हा सण लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांच्याच आवडीचा आहे. दिवाळीचे आगमन होताच सर्वत्र चैतन्याचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण होते. घराघरांत स्वच्छता, सजावट, आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, फराळ आणि नवीन कपड्यांची लगबग सुरू होते. त्यामुळेच दिवाळीला सणांचा राजा म्हटले जाते.

लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे आनंदाची पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवीन कपडे, फटाके, मिठाई, फराळ, किल्ला बनविणे आणि मामाच्या गावाला जाणे अशा अनेक आवडत्या गोष्टी दिवाळीत अनुभवायला मिळतात. भाऊबीजेच्या निमित्ताने भाऊ–बहिणींच्या नात्यातील प्रेम आणि जिव्हाळा अधिक दृढ होतो. सासरी गेलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी माहेरी येते. त्यामुळे दिवाळी हा केवळ दिव्यांचा सण नसून नाती जपणारा आणि माणसांना एकमेकांशी जोडणारा सणदेखील आहे.

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा दीपोत्सव! या सणाच्या निमित्ताने बाजारपेठा आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या, मिठाई, फराळाचे साहित्य आणि नवीन कपड्यांनी सजून जातात. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झालेला नाही. प्रत्येक जण आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार दिवाळी साजरी करण्याचा प्रयत्न करतो. मात्र, हा आनंद साजरा करताना समाजातील दुर्लक्षित घटकांच्या परिस्थितीचेही भान ठेवणे आवश्यक आहे.

आपण आपल्या घरात आनंदाने दिवाळी साजरी करत असताना जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाच्या घरातील दिवाळी मात्र अनेकदा अंधारात असते. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, तर कधी शेतमालाला योग्य भाव न मिळाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. वर्षभर कष्ट करूनही त्याच्या पदरी निराशाच पडत असेल, तर ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. आपल्या घरात दिव्यांची रोषणाई करताना शेतकऱ्याच्या घरातही आनंदाचा दिवा पेटावा, यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. शेतकऱ्यांकडून शक्य तिथे शेतमालाची थेट खरेदी करणे, गरजू शेतकरी कुटुंबांना मदत करणे आणि त्यांच्या कष्टांचा सन्मान करणे, हीदेखील दिवाळी साजरी करण्याची एक चांगली पद्धत ठरू शकते.

दिवाळी हा केवळ बाह्य प्रकाशाचा उत्सव नाही, तर अंतःकरणातील अंधार दूर करण्याची प्रेरणा देणारा सण आहे. घराबाहेर आकाशकंदील आणि पणत्या लावून आपण अंधार दूर करतो; परंतु आपल्या मनातील अज्ञान, अंधश्रद्धा, द्वेष, मत्सर, अहंकार आणि विषमतेचा अंधार दूर करण्याचा प्रयत्नही केला पाहिजे. ज्ञान, विवेक, प्रेम, बंधुभाव आणि सद्विचारांचे दिवे आपल्या अंतःकरणात प्रज्वलित झाले, तरच जीवन खऱ्या अर्थाने प्रकाशमय होईल.

आज समाजात गरीब, कष्टकरी, अनाथ, निराधार, दिव्यांग आणि वंचित असा मोठा वर्ग आहे. अनेकांच्या घरात दिवाळीच्या दिवशीही गोडधोड बनत नाही. काही मुलांना नवीन कपडे मिळत नाहीत, तर काही कुटुंबांना दोन वेळचे अन्न मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत आपण आपल्या घरात दिवाळी साजरी करताना या लोकांच्याही जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गरजू मुलांना नवीन कपडे, शैक्षणिक साहित्य, मिठाई देणे, वृद्धाश्रमातील ज्येष्ठांची भेट घेणे, अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी करणे, गरजू कुटुंबांना अन्नधान्याची मदत करणे अशा छोट्या–छोट्या कृतींतून आपण त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवू शकतो.

दिवाळी साजरी करताना पर्यावरणाचे भान राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. फटाक्यांच्या अतिवापरामुळे वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण वाढते. त्याचा त्रास लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि प्राणी–पक्ष्यांना सहन करावा लागतो. त्यामुळे फटाक्यांचा अनावश्यक वापर टाळून मातीच्या पणत्या लावणे, पर्यावरणपूरक सजावट करणे आणि स्वच्छतेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. आनंद साजरा करताना दुसऱ्यांच्या आनंदावर किंवा आरोग्यावर विरजण पडणार नाही, याची काळजी घेणे हीच खरी सामाजिक जाणीव आहे.

साने गुरुजींच्या विचारांप्रमाणे प्रेम, करुणा आणि मानवता हीच खऱ्या अर्थाने जीवनाची संपत्ती आहे. केवळ घराबाहेर असंख्य दिवे लावून दिवाळी साजरी होत नाही, तर अंतःकरणात प्रेमाच्या आणि माणुसकीच्या पणत्या प्रज्वलित झाल्या पाहिजेत. आपल्या ताटातील अन्न स्वतः खाणे ही प्रवृत्ती, दुसऱ्याच्या ताटातील अन्न ओरबाडणे ही विकृती, तर आपल्या ताटातील अन्न दुसऱ्याला देणे ही संस्कृती आहे. या संस्कृतीचे जतन करण्याची संधी दिवाळी आपल्याला देत असते.

मानवाच्या जीवनात सुख आणि आनंद निर्माण करण्यासाठी अनेक धडपडी सुरू असतात. मात्र, खरा आनंद केवळ स्वतःच्या सुखात नसून दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यात आहे. दुसऱ्याचे दुःख समजून घेणे, गरजूंना मदतीचा हात देणे, निराधारांना आधार देणे आणि समाजातील दुर्बल घटकांना सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे, यातच माणुसकीचे खरे सार्थक आहे.

चला तर मग, या दिवाळीत केवळ घराघरांत दिवे लावण्यापुरते मर्यादित न राहता माणसामाणसांतील प्रेमाचा आणि विश्वासाचा दीप प्रज्वलित करूया. दीन–दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊया, गरजूंना मदतीचा हात देऊया आणि त्यांच्या जीवनात आनंदाची फुले फुलवूया. आपल्या घरातील दिव्यांबरोबरच दुसऱ्यांच्या जीवनातही प्रकाश निर्माण करण्याचा संकल्प करूया.

कारण दिवाळीचा खरा आनंद फटाक्यांच्या आतषबाजीत किंवा रोषणाईत नसून दुसऱ्याच्या चेहऱ्यावर फुललेल्या हास्यात आहे. आपल्या आनंदात दुसऱ्यांना सहभागी करून घेतले, त्यांच्या जीवनातील दुःखाचा अंधार दूर केला, तरच दिवाळीचा हा प्रकाशोत्सव खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल. चला, या दिवाळीत माणुसकीचा, प्रेमाचा आणि मानवतेचा दीप लावूया!



श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे

उजनीतील वाळू वाहतूक कोणाच्या आशीर्वादाने?

खासदार धैर्यशील मोहिते-पाटलांचा सवाल; प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

सोलापूर (कटूसत्य वृत्त):– उजनी धरणातील वाळूचा विषय आता केवळ अवैध उत्खननापुरता मर्यादित राहिलेला नसून, या वाळू वाहतुकीमागे नेमके कोणाचे पाठबळ आहे, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. उजनीत अधिकृत वाळू उपसा सुरू नसताना वाळूची वाहतूक सुरू कशी, असा सवाल खासदार धैर्यशील मोहिते–पाटील यांनी उपस्थित केला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण भूमिकेमुळे आता प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



वाळूने भरलेली वाहने रस्त्यावरून धावत असतील, तर त्यांना रोखण्याची जबाबदारी असलेली यंत्रणा नेमकी काय करत आहे, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. खासदार मोहिते–पाटील यांनी हा मुद्दा विविध सार्वजनिक व्यासपीठांवर मांडल्याने उजनीतील वाळू वाहतुकीचा विषय पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. तुळशी येथे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या भेटीदरम्यान खासदार मोहिते–पाटील यांनी उजनी धरणातील गाळ काढण्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. धरणातील गाळ काढण्याच्या कामाकडे दुर्लक्ष होत असताना दुसरीकडे वाळू चोरी सुरू असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली होती.

त्यानंतर ३१ ऑक्टोबर रोजी भीमानगर येथे झालेल्या सभेतही त्यांनी हा मुद्दा अधिक ठामपणे उपस्थित केला. पोलिस बंदोबस्तात वाळू वाहतूक होत असल्याचा आरोप त्यांनी केल्याने या प्रकरणाला अधिक गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे.

पोलिस बंदोबस्त नेमका कोणत्या कारणासाठी दिला जातो? तो अधिकृत आदेशानुसार असतो का? वाळू वाहून नेणाऱ्या संबंधित वाहनांची तपासणी केली जाते का? असे अनेक प्रश्न आता प्रशासनासमोर उभे ठाकले आहेत. खासदारांच्या आरोपांमुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

मात्र, या आरोपांबाबत संबंधित प्रशासकीय विभागांची बाजू आणि वस्तुस्थितीही समोर येणे तितकेच महत्त्वाचे आहे. जर बेकायदा वाळू वाहतूक होत असेल आणि ती रोखण्याऐवजी संबंधित यंत्रणांकडून दुर्लक्ष केले जात असेल, तर त्याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

धैर्यशील मोहिते-पाटलांनी विषय लावून धरला!

उजनीच्या पाण्याचा प्रश्न असो, धरणातील गाळाचा प्रश्न असो किंवा वाळू चोरीचा मुद्दा असो, खासदार धैर्यशील मोहिते–पाटील यांनी हे विषय सातत्याने सार्वजनिक व्यासपीठावर मांडले आहेत. आता वाळू वाहतुकीचा मुद्दा त्यांनी थेट सभेत उपस्थित केल्याने प्रशासनाला याबाबत स्पष्टीकरण द्यावे लागणार आहे.

उजनी धरणाच्या पाण्यावर परिसरातील हजारो शेतकऱ्यांचे भविष्य अवलंबून आहे. धरणातील गाळामुळे साठवण क्षमतेवर परिणाम होण्याचा प्रश्न असताना गाळ उपशाच्या कामाला अपेक्षित गती मिळत नसल्याची चर्चा आहे. दुसरीकडे वाळू चोरीच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत.

अधिकृत वाळू उपसा सुरू नसताना उजनीची वाळू रस्त्यावर येते कुठून? या वाहतुकीला नेमके कोणाचे अभय आहे? आणि उजनीतील नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेली यंत्रणा नेमकी कोणाच्या प्रतीक्षेत आहे?

या प्रश्नांची स्पष्ट आणि ठोस उत्तरे मिळेपर्यंत उजनीतील वाळू वाहतुकीचा मुद्दा शांत होण्याची चिन्हे नाहीत.

पान १ वरून

डीसीसी निवडणूक...

यांनी युक्तीवाद केला.

माजी आ. रणजितसिंह मोहिते–पाटील, माजी आ. संजयमामा शिंदे, माजी आ. जयवंतराव जगताप, जिल्हा बँकेचे माजी संचालक सुरेश हसापुरे, बबनराव आवताडे हे बँकेची रक्कम भरण्यास तयार होते. मात्र, बँकेने पैसे भरुन घेण्यास नकार दिला. कलम ८८ चौकशी सहकारमंत्र्यांकडे प्रलंबित आहे. तसेच उच्च न्यायालयाने जबरदस्तीने कर्ज वसुली करु नका, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे बँकेच्या निवडणुकीसाठी अर्ज भरलेले उमेदवार अपात्र कसे ठरतात, असा युक्तीवाद ॲड. मराठे, पाटील यांनी केला.

ॲड. कुलकर्णी, कुर्जेकरांकडून कलम ११० (अ) चा युक्तीवाद

रिझर्व्ह बँकेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याच्या अगोदर माजी आ. संजयमामा शिंदे, माजी आ. प्रशांत परिचारक, सुरेश हसापुरे, बबनराव आवताडे यांनी राजीनामा दिला. त्यामुळे ते कलम ११० (अ) नुसार अपात्र ठरत नाहीत. त्यामुळे त्यांचा अर्ज वैध करावा, असा युक्तीवाद ॲड. अभिजित कुलकर्णी, ॲड. धनंजय कुर्जेकर यांनी केल्याची माहिती समोर आली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील ५ लाख १७ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात २५८ कोटी ६४ हजाराची मदत जमा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):– सन २०२६ च्या खरीप हंगामात राज्यातील ट्रिगर–१ लागू झालेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने दिवाळीपूर्वी प्रत्येकी ५ हजार रुपये अग्रीम आर्थिक मदत थेट बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयास दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतपिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी द्यावयाच्या मदतीचे स्वरूप अंतिम करण्यासाठी पीक वर्गवारीनिहाय व क्षेत्रनिहाय तपशील निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे. मात्र, शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी तातडीचा आर्थिक दिलासा मिळावा, यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीतील निर्देशानुसार प्रत्येकी ५ हजार रुपये अग्रीम मदत देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील ९ लाख ५२ हजार ५८ शेतकऱ्यांच्या याद्यांना ई–पंचनामा पोर्टलवर मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ५ लाख १७ हजार २८५ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये एकूण २५८ कोटी ६४ हजार रुपये जमा करण्यात आले आहेत. उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांमध्येही मदतीची रक्कम लवकरच जमा होणार आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

सोलापूर-पुणे महामार्गावर काळाचा घाला!

मोहोळ (कटूसत्य वृत्त):– सोलापूर–पुणे राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या कडेला मुरूम साईडपट्टीवर उभ्या असलेल्या कंटेनरला कारने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील आजी–आजोबा, सून आणि आठ वर्षीय नातवाचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर अन्य एक जण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात मोहोळ तालुक्यातील तेलंगवाडी शिवारातील डोंगरे वस्ती परिसरात शुक्रवारी (ता. ६) दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास घडला. विलास भारंबे (वय ६६), शोभा विलास भारंबे (वय ६३), पूनम तुषार भारंबे (वय ३८) आणि पार्थ तुषार भारंबे (वय ८) अशी मृतांची नावे आहेत. तर तुषार विलास भारंबे (वय ४०) हे जखमी असून त्यांच्यावर सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृत व जखमी हे कल्याण येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.



मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण (मुंबई) येथील भारंबे कुटुंबीय त्यांच्या एर्टिगा कारमधून (क्रमांक एमएच ०४ केएल ५२२२) देवदर्शनासाठी अक्कलकोट व तुळजापूरकडे निघाले होते. दरम्यान, तेलंगवाडी शिवारातील मुरूम साईडपट्टीवर कंटेनर (क्रमांक एनएल ०१ एएल १३७९) रस्त्याच्या कडेला उभा होता. दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास भरधाव एर्टिगा कारने कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की विलास भारंबे, शोभा भारंबे आणि लहानगा पार्थ भारंबे यांचा जागीच मृत्यू झाला. तर तुषार भारंबे आणि त्यांची पत्नी पूनम भारंबे गंभीर जखमी झाले. दोघांनाही तातडीने उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना पूनम भारंबे यांचीही प्राणज्योत मालवली. अपघाताची माहिती मिळताच अप्पर पोलिस अधीक्षक विजय कबाडे तसेच मोहोळ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दीपक पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व अपघात पथकाला आवश्यक सूचना दिल्या.

पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन पाण्याचा काटकसरीने वापर करावा : पालकमंत्री गोरे

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):– जिल्ह्यातील उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन सर्व पाणीपुरवठा योजनांना नियमानुसार पाणी उपलब्ध करून देण्यात येईल. उजनी धरणासह मध्यम व लघु प्रकल्पांतील पाणीसाठा मर्यादित असल्याने नागरिकांनी पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा. महापालिका व नगरपालिकांनी शासन निर्णयानुसार १० टक्के पाणी बचतीचे काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित उजनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार उत्तम जानकर, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण चे अधीक्षक अभियंता सुभवेंद्र खांडेकर, धीरज साळी, जलसंपदाचे कार्यकारी अभियंता सुनील पवार, श्री. कंदले, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तर खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सचिन कल्याणशेट्टी, पुणे जिल्हाधिकारी, अहिल्यानगर जिल्हाधिकारी तसेच जलसंपदाचे पुणे येथील वरिष्ठ अधिकारी हे दूरदृष्य प्रणाली द्वारे सहभागी होते.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले की, सद्यस्थितीत उजनी धरणात ६५ टक्के पाणीसाठा असून मध्यम व लघु प्रकल्पांमध्येही अत्यल्प पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे उपलब्ध पाणी प्रामुख्याने पिण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. पाणीपुरवठा योजनांना नियमानुसार पाणी उपलब्ध करून देण्यात येईल. पाण्याचा अनावश्यक वापर आणि होणारी नासाडी रोखण्यासाठी प्रशासनासह लोकप्रतिनिधी व नागरिकांनीही प्रयत्न करावेत. धरणातील पाण्याची सद्यस्थिती शेतकरी व नागरिकांना समजावून सांगण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींनीही घ्यावी. पाण्याची नासाडी टाळल्यास किमान १० ते १५ टक्के पाणी बचत करणे शक्य असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

नदी व कालव्यालगतच्या गावांना एक दिवसाआड सलग सहा तास वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधीच्या मागणीप्रमाणे नियोजन करावे. यासाठी जिल्हाधिकारी सोलापूर यांनी पुणे व अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय ठेवावा. तिन्ही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना एकाच वेळी आणि समप्रमाणात वीजपुरवठा उपलब्ध होईल, याची दक्षता घ्यावी.

ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे आणि पिके उभी आहेत, त्यांना आवश्यक पाणी मिळणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित करण्याबाबत निर्णय घेताना शेतकऱ्यांच्या पिकांचा विचार करून योग्य नियोजन करावे, असेही त्यांनी निर्देशित केले.



पाणी प्रकल्पातून आवर्तन सुरू करण्यापूर्वी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधावा. आवर्तन सुरू करण्यापूर्वी संबंधित भागात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेतील लागू तरतुदींनुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्याबाबत कार्यवाही करावी. पाणी सोडल्यानंतर कालवा फोडणे किंवा पाण्याचा अनधिकृत उपसा करणे असे प्रकार आढळल्यास जलसंपदा विभागाने संबंधितांविरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करावेत. पोलीस विभागानेही अशा प्रकारांची गंभीर दखल घेऊन कठोर कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले.

पुढील पाणी आवर्तनाचे नियोजन डिसेंबर २०२६ अखेर, जानेवारी २०२७ च्या पहिल्या आठवड्यात तसेच फेब्रुवारी २०२७ मध्ये उपलब्ध पाणीसाठा व गरज लक्षात घेऊन करावे. जलसंपदा विभागाच्या नादुरुस्त यंत्रणा तातडीने दुरुस्त करून घ्याव्यात. तसेच अतिरिक्त पंप उपलब्ध करून घेण्यासाठी संबंधित उपाययोजनेंतर्गत आवश्यक निधीची मागणी करावी, असेही त्यांनी सूचित केले.

यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार सुभाष देशमुख, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तम जानकर आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राजेंद्र राऊत यांनी पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याची मागणी केली. पाणीपुरवठा करताना शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचेल आणि जिल्ह्यातील प्रत्येक गावातील नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध होईल, याची दक्षता घेण्याची सूचना त्यांनी केली.

जिल्हाधिकारी म्हणाले की, पालकमंत्री महोदय यांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. तसेच जिल्हाधिकारी अहिल्यानगर व जिल्हाधिकारी पुणे यांच्याशी समन्वय ठेवून नदीकाठच्या गावांना वीज पुरवठा बाबत कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

प्रारंभी अधीक्षक अभियंता श्री खांडेकर यांनी उजनी धरण व जिल्ह्यातील सर्व मध्यम प्रकल्प व लघु प्रकल्पातील पाण्याची सद्यस्थिती सांगितली. आज रोजी उजनी धरणात ६५ टक्के पाणी उपलब्ध आहे तर मध्यम प्रकल्पांच्या पाणीसाठ्याच्या दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या सद्यस्थितीनुसार, एकरुख प्रकल्पातील ०.५५ टीएमसी पाणीसाठ्यावर सोलापूर, गोदुताई परुळेकर सहकारी संस्था व १४ ग्रामपंचायती अवलंबून असून ते पाणी दि. ३० जून २०२७ पर्यंत पुरणार आहे.

हिंगणी (पा) प्रकल्पातील ०.४४ टीएमसी पाण्यावर वैराग व ९ ग्रामपंचायती अवलंबून असून ते दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत, तर जवळगाव प्रकल्पातील ०.३६ टीएमसी पाण्यावर ९ ग्रामपंचायती अवलंबून असून तेही दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पुरणार आहे.

मांगी प्रकल्पातील ०.०९ टीएमसी पाण्यावर १३ ग्रामपंचायती अवलंबून असून ते फक्त दि. ३१ जानेवारी २०२७ पर्यंत, आष्टी प्रकल्पातील ०.४८ टीएमसी पाण्यावर माढा व ६ ग्रामपंचायती अवलंबून असून या योजनेसाठी उजनी डाव्या कालव्यावाटे पाणी सोडण्यात येते, बोरी प्रकल्पातील ०.१७ टीएमसी पाण्यावर अक्कलकोट व ७ ग्रामपंचायती अवलंबून असून ते दि. २८ फेब्रुवारी २०२७ पर्यंत, तर पिंपळगाव (दा) प्रकल्पातील ०.०२ टीएमसी पाण्यावर ७ ग्रामपंचायती अवलंबून असून ते केवळ दि. ३१ डिसेंबर २०२६ पुरेल असे त्यांनी सांगितले.

उर्वरित रब्बी हंगामातील अपेक्षित पाणीवापराचा कालावधी दि. ४ नोव्हेंबर २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२७ असा नियोजित करण्यात आला आहे.

या कालावधीत बाष्पीभवन व्ययासाठी ४.२८ टीएमसी, जलाशय उपसा सिंचनासाठी ३.२१ टीएमसी, जलाशय बिगर सिंचन (पिण्यासाठी) ०.८२ टीएमसी, जलाशय बिगर सिंचन (औद्योगिक) ०.६० टीएमसी आणि जलाशयातील गाळासाठी ३.८७ टीएमसी पाणी नियोजित आहे. तसेच सीना–माढा उपसा सिंचन योजनेच्या सिंचन आवर्तनासाठी दि. १५ डिसेंबर २०२६ ते १० फेब्रुवारी २०२७ या कालावधीत १.३१ टीएमसी, दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या सिंचन आवर्तनासाठी याच कालावधीत ०.५७ टीएमसी, कालवा प्रवाही सिंचन आवर्तनासाठी (आष्टी व एकरुख उपसा सिंचन योजनांसह) दि. १ जानेवारी २०२७ ते १५ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत ९.५० टीएमसी, तर भीमा–सीना जोड कालव्याच्या सिंचन आवर्तनासाठी (बार्शी, शिरापूर व शिराळा उपसा सिंचन योजना आणि आकस्मिक वापरासह) दि. २५ डिसेंबर २०२६ ते २५ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत ४.५३ टीएमसी पाणी नियोजित करण्यात आले आहे.

याशिवाय भीमा नदीतून पिण्याच्या पाण्यासाठी ९.०० टीएमसी पाणी राखीव ठेवण्यात आले आहे.

अशा प्रकारे उर्वरित रब्बी हंगामासाठी एकूण ३७.६९ टीएमसी पाणी वापराचे नियोजन करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडुरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

ऑर्किड स्कूलच्या विद्यार्थ्यांचा सोलापूर मध्ये जिल्हा स्तरीय क्रिकेट स्पर्धेत गोल्ड मेडल



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहरातील नामांकित नागेश करजगी ऑर्किड स्कूल मधील विद्यार्थ्यांनी शालेय शहरस्तरीय वयोगट 14 वर्षाखालील क्रिकेट या क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत प्रथम क्रमांक प्राप्त केले आहे. अंतिम सामना एलएफसी सोबत 47 रन चेस करत तीन बॉल राखून विजेतेपद प्राप्त केले.

या स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत सोमपा क्रीडा कार्यालय सोलापूर शालेय शहरस्तरीय क्रिकेट क्रीडा स्पर्धेत संघाचे कॅप्टन कबीर कीर्तीकर, आणि वाइस कॅप्टन अनिश बिरोली तसेच सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट तांत्रिक खेळ,अष्टपैलु कामगिरी आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी होणाऱ्या विभाग स्पर्धे साठी निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा सौ.वर्षाताई विभुते, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, शाळेचे मेंटर सौ.मीना पारखे, शाळेचे प्राचार्या सौ.रश्मी कुंभार यांनी शुभेच्छा दिल्या.

वरील सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा विभाग प्रमुख श्री आनंद लिगाडे, ज्ञानदीप जाधव, अश्विनी ढेरे आणि नीलेश गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दहिगाव योजनेचे पाणी सोडण्याची मागणी

आमदार नारायण पाटील यांची विखे-पाटलांशी चर्चा



करमाळा,(कटूसत्य वृत्त):- करमाळा तालुक्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती, अनियमित पाऊस आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न लक्षात घेता दहिगाव उपसा जलसिंचन योजनेतून तातडीने पाणी आवर्तन सोडण्यात यावे, अशी मागणी आमदार नारायण (आबा) पाटील यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात आमदार पाटील यांनी मुंबई येथील सह्याद्री अतिथिगृह येथे जलसंपदा मंत्र्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

अल निनोचा संभाव्य प्रभाव आणि यंदाच्या पावसाची अनिश्चितता लक्षात घेता करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर पाण्याचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. तालुक्यात झालेला अनियमित पाऊस, खरीप हंगामातील पिकांचे झालेले नुकसान, रब्बी हंगामासाठी पाण्याची अनिश्चितता तसेच आगामी काळात उद्भवू शकणारी पाणीटंचाई या महत्त्वाच्या बाबींकडे आमदार पाटील यांनी जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधले. दहिगाव उपसा जलसिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांसाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर संभाव्य पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेता या योजनेतून तातडीने पाणी आवर्तन सोडण्याबाबत संबंधित विभागाला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी आग्रही मागणी आमदार पाटील यांनी यावेळी केली.

करमाळा तालुक्यातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने पावसातील अनियमितेचा परिणाम थेट शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होत आहे. अशा परिस्थितीत दहिगाव उपसा सिंचन योजनेचे पाणी वेळेत उपलब्ध झाल्यास लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी मोठा आधार मिळू शकतो.

त्यामुळे आमदार पाटील यांनी जलसंपदा मंत्र्यांकडे केलेल्या या मागणीकडे तालुक्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

विरोधी पक्षाच्या मागणीला यश

स्वच्छता कर्मचाऱ्यांना पाच हजारांची दिवाळी अग्रीम रक्कम जाहीर



करमाळा (कटूसत्य वृत्त):- करमाळा नगर परिषदेचे तत्कालीन नगराध्यक्ष वैभवराजे जगताप यांच्या कार्यकाळात दिल्या जाणाऱ्या दिवाळी अग्रीम रकमेच्या धर्तीवर यंदाही स्वच्छता कर्मचाऱ्यांना अग्रीम रक्कम देण्यात यावी, अशी मागणी विरोधी पक्षाच्या वतीने करण्यात आली होती. विरोधी पक्षनेते प्रशांत ढाळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या मागणीला अखेर यश आले असून, नगरपालिका प्रशासनाने कायम सेवेत असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये दिवाळी अग्रीम रक्कम जाहीर केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने कायमस्वरूपी सेवेत असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी अग्रीम रक्कम जाहीर केली असली तरी कंत्राटी स्वच्छता कर्मचाऱ्यांना अद्याप याचा लाभ देण्यात आलेला नाही. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही तातडीने दिवाळी अग्रीम रक्कम जाहीर करून ती वितरित करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रशांत ढाळे, नगरसेवक युवराज चिवटे, नगरसेविका अश्विनी कांबळे-अब्दुले, सुवर्णा आलाट आणि साजेदा कुरेशी यांनी केली आहे.

अकलूज बस डेपोसाठी २० चालक व २० वाहकांची मागणी

परिवहनमंत्र्यांचे तातडीने कार्यवाहीचे आश्वासन!



नातेपुते (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या सोलापूर-धाराशिव दौऱ्यादरम्यान शिवसेनेचे सोलापूर जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर-पाटील यांनी अकलूज एसटी बस डेपोसाठी तातडीने २० चालक व २० वाहक उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यासंदर्भात त्यांनी परिवहनमंत्री सरनाईक यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर केले. या मागणीची तातडीने पूर्तता करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिल्याने अकलूज तालुक्यातील प्रवाशांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत.

अकलूज बस डेपोअंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांना एसटी महामंडळाच्या माध्यमातून नियमित बससेवा पुरविण्यात येते. मात्र, सध्या डेपोमध्ये चालक व वाहकांची संख्या अपुरी असल्याने उपलब्ध बसेस नियमितपणे चालविण्यात अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी अनेक बसफेऱ्यांवर परिणाम होत असून विद्यार्थी, नोकरदार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या सहकार्याने अकलूज बस डेपोसाठी मागणीनुसार २० नवीन एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मात्र, या बसेस चालविण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने त्यांचा अपेक्षित उपयोग होत नसल्याची बाब निवेदनातून निदर्शनास आणून देण्यात आली.

अकलूज डेपोसाठी तातडीने २० चालक व २० वाहकांची नियुक्ती करण्यात यावी, जेणेकरून बंद अथवा कमी झालेल्या बसफेऱ्या पुन्हा पूर्ववत सुरू करता येतील. ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांपर्यंत एसटीची सेवा नियमित पोहोचेल आणि विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा मिळेल, अशी मागणी राजकुमार हिवरकर-पाटील यांनी निवेदनाद्वारे केली.

या मागणीची परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक दखल घेत लवकरच आवश्यक कार्यवाही करून कर्मचाऱ्यांची उपलब्धता करून देण्यात येईल, असे आश्वासन दिले.चालक व वाहक उपलब्ध झाल्यास अकलूजची लालपरी पुन्हा शहरापासून ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांपर्यंत नियमित धावण्याचा मार्ग मोकळा होणार असून, विद्यार्थी आणि सर्वसामान्य प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होण्यास मदत होणार आ असल्याचेही राजकुमार हिवरकर पाटील यांनी सांगितले

जिल्ह्यात ऊस दराची कोंडी कायम

२४ साखर कारखान्यांनी अद्याप दर जाहीर केलेला नाही



सोलापूर (कटूसत्य वृत्त):-कोल्हापूर, सांगली, सातारा, धाराशिव, लातूरसह राज्यातील अनेक जिल्ह्यांतील साखर कारखान्यांनी चालू गाळप हंगामासाठी उसाचा दर जाहीर केला असताना, सोलापूर जिल्ह्यात मात्र ऊस दराची कोंडी अद्याप कायम आहे. जिल्ह्यातील केवळ सात ते आठ साखर कारखान्यांनी प्रतिटन ३,१५० रुपये इतका दर जाहीर केला असून, तब्बल २४ कारखान्यांनी अद्याप उसाचा दर जाहीर केलेला नाही. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

सोलापूर जिल्हा हा राज्यातील प्रमुख ऊस उत्पादक जिल्ह्यांपैकी एक आहे. जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू झाला असला, तरी बहुतांश कारखानदारांनी ऊस खरेदीचा दर स्पष्ट केलेला नाही. परिणामी, आपला ऊस कोणत्या दराने कारखान्याला द्यायचा, याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

कोल्हापूर, सांगली आणि सातारा या साखर पट्ट्यातील कारखानदारांनी उसाला दर जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.

धाराशिव आणि लातूरसह इतर जिल्ह्यांतील कारखान्यांनीही दराबाबत भूमिका स्पष्ट केली आहे.

मात्र सोलापूर जिल्ह्यातील मोजक्याच सात ते आठ कारखान्यांनी प्रतिटन ३,१५० रुपये दर जाहीर केला आहे. उर्वरित कारखान्यांकडून अद्याप कोणतीही स्पष्ट घोषणा करण्यात आलेली नाही.

दरम्यान, वाढलेला उत्पादन खर्च, मजुरी, खते, औषधे आणि वाहतूक खर्च यामुळे ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

अशा परिस्थितीत उसाचा योग्य आणि रास्त दर जाहीर करण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून जोर धरू लागली आहे.

रयत क्रांती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार यांनी साखर कारखानदारांना इशारा देत जिल्ह्यातील कारखान्यांनी लवकरात लवकर उसाचा दर जाहीर करावा, अशी मागणी केली आहे. उसाला प्रतिटन किमान ३,५०० रुपये दर जाहीर करण्यात यावा, अन्यथा सुरू असलेले साखर कारखाने बंद पाडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

ऊस दराची अनिश्चितता कायम

जिल्ह्यातील एकूण साखर कारखान्यांची संख्या पाहता तब्बल २४ कारखान्यांनी अद्याप उसाचा दर जाहीर केलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून, ऊस दराबाबतची अनिश्चितता कायम आहे. कारखानदारांनी तातडीने दर जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

'जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी लवकरात लवकर उसाला प्रतिटन ३,५०० रुपये दर जाहीर करावा. अन्यथा सुरू झालेले कारखाने बंद पाडण्यात येतील,' असा इशारा नामदेव पवार यांनी दिला आहे.

'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारा'ने दयानंद चौधरी सन्मानित



करमाळा (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या माध्यमातून दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६-२७ करमाळा नगरपालिकेच्या पी. एम. श्री. सा. ना. जगताप प्राथमिक मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक दयानंद छगन चौधरी सर यांना प्राप्त झाला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे करमाळ्याच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव झाला असून, शिक्षक, शिक्षणप्रेमी आणि नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना दयानंद चौधरी सर यांनी शाळेची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी, विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शाळेत आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांचे अध्यापनातील योगदान, विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ आणि शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक दृष्टिकोन उल्लेखनीय आहे. विशेष म्हणजे, शाळेला केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी पी. एम. श्री. (प्रधानमंत्री स्कूल्स फॉर रायझिंग इंडिया) योजनेअंतर्गत स्थान मिळवून देण्याच्या प्रक्रियेतही चौधरी सरांचे प्रयत्न आणि मेहनत महत्त्वपूर्ण ठरली आहे. शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळे शाळेच्या प्रगतीला नवी दिशा मिळाली. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय वाटचाल केली आहे.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच शाळेचा सर्वांगीण विकास साधण्याच्या त्यांच्या कार्याची दखल आता राज्यस्तरावर घेतली गेली आहे. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराच्या रूपाने त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव झाला असून, हा सन्मान त्यांच्या आजवरच्या मेहनतीची आणि समर्पणाची पोचपावती मानली जात आहे.

चौधरी सर यांना पुरस्कार प्राप्त झाल्याचे समजल्यानंतर त्यांच्या शाळेतील सर्व शिक्षक वृंदांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याबद्दल चौधरी सर यांनी सर्व शिक्षक वृंदांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. एका शिक्षकाने आपल्या कार्यातून शाळेची ओळख निर्माण करणे आणि त्याच कायार्ची राज्यस्तरावर दखल घेतली जाणे ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. दयानंद चौधरी सर यांना मिळालेला हा सन्मान करमाळा शहरातील शैक्षणिक क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरणारा असून, त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू



जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदनः या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

कटूसत्य शब्दकोडे

१			२	३	४		■	५		६	■
	■	■	७			■	८		■	९	१०
११	१२		■		■	१३	■	१४	१५		
१६		■	१७	■	१८		१९	■	२०		■
	■	२१				■	२२			■	२३
■	२४			■	२५	२६		■	२७	२८	
२९			■	३०			■	३१	■	३२	
३३		■	३४			■	■	३५			
■	३६			■	३७	३८	३९		■	■	■
४०	■	■	४१		■	४२		■	४३	४४	४५
४६	४७			■	४८		■	४९			
५०				■	५१				■	■	

उभे शब्द : १) गांधी घराण्यामुळे चर्चेत येणारा युपीतील लोकसभा मतदारसंघ २) आकाश, गगन ३) टेनिस स्पर्धेतील विश्वविजेता खेळाडू-*** फेडरर ४) नय उलट लिहा ५) महाराणा प्रताप यांच्या घोड्याचे नाव ६) बिल्डिंग (मराठीत) १०) वाईट सवय १२) धान्याचा ढीग १३) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक १५) मग्न, लीन, एकरूप होणे १७) एक भारतीय फलंदाज - *** अय्यर १८) विजेचे लोडशेडिंग (मराठीत) १९) गस्त घालणे, राखण करणे २१) एखाद्या गोष्टीतील रूची, छंद २३) एक म्हण-**** लंगडी गाय शहाणी २४) शालेय पुस्तकांचे प्रकाशन करणारी एक संस्था २६) पावट्याप्रमाणे द्विदल कडधान्य २८) गुरांचे मांस विक्री करणारा २९) विषमच्या विरूध्दार्थी शब्द ३०) भिंतीवरील सरपटणारा प्राणी ३१) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द ३४) मन वळविण्याचा प्रयत्न ३८) भक्कम, कणखर ३९) आकाश (इंग्रजीत) ४०) डोक्याचे केस काळे करणे ४३) मनाला टोचणी लावणारे शल्य ४४)चपाती याच्यावर भाजतात ४५) प्रगती (हिंदीत) ४७) धातूचा तंतू, ४८) डोकेदुखीवर कपाळाला लावायचा मलम ४९)सर्व (हिंदीत)

आडवे शब्द : १) आयपीएल क्रिकेट स्पर्धेतील एक संघ ५) महेंद्रसिंग धोनीचा आयपीएलमधील संघ-*** सुपर किंग्ज ७) देवाचे नामस्मरण, ईशस्तवन ८) आठवड्याचे एकूण दिवस ९) किंमती वस्तू, ऐवज ११) अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष-*** ओबामा १४) व्यायाम, मेहनत १६) शर्यत (इंग्रजीत) १८) देवेंद्र फडणवीस या पक्षाचे नेते आहेत २०) निवडणुकीत उमेदवाराला करतात ते **दान २१) इन्कमटॅक्स (मराठीत) २२) एक म्हण-*** तो वजीर २४) इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे २५) मानवाच्या मूलभूत गरजांपैकी एक २७) पौष्टीक, सत्वयुक्त २९) कामातून मिळालेली उसंत ३०) पैंजण (हिंदीत) ३२) सैफ अली खानची अभिनेत्री असलेली मुलगी ३३) पैसे (इंग्रजीत) ३४) जखमेवर लावायचे औषध ३५) सरावलेला, पटाईत ३६) पाणी पिण्याची तीव्र इच्छा ३७) वंदन, रामराम, अभिवादन ४१) पैसा, संपत्ती ४२) यश, सफलता ४३) सातत्याने, नेहमी, खंड न पडता ४६) गानसम्राज्ञी-** मंगेशकर ४८) स्वातंत्र्यापूर्वी स्वदेशीचे नारे देत ब्रिटिशांच्या गाडीसमोर आत्मबलिदान करणारे देशभक्त-** गेणू ४९) कुर्त्याचा जोडीदार ५०) नांदेड लगतचा एक जिल्हा ५१) स्वार्थ, हेतू

सुडोकु - 94

8	7			4	2	9	1	5
1	3		5		8		2	
5		2					8	3
4		3				8	7	
	6	7			1	3		
						2	5	
		4	6		5		3	
6		1			4	5		8
	8		2					4

खास दिवाळीनिमित्त आणि तसेच येणाऱ्या लग्नसराई निमित्त आर्द्रा द फॅमिली शॉपिंग मॉल ला खरेदी करण्यासाठी ग्राहकांची प्रचंड गर्दी

लग्नाचा बस्ता तेही भरपूर व्हरायटीजसह थेट होलसेल दरात !

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- फॅशनचे नवीन डेस्टिनेशन असलेल्या आणि सोलापुरात अल्पावधीतच लोकप्रिय ठरलेल्या "आर्द्रा"- द फॅमिली शॉपिंग मॉल ला दिवाळी आणि लग्नसराई निमित्त खरेदीसाठी सोलापूर शहर व परिसरातील अनेक कुटुंबांची गर्दी होत असल्याचे आर्द्रा चे प्रमुख व्यवस्थापक सांगितले.

डी-मार्ट समोर, सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग, सर्विस रोड, सोलापूर येथे "आर्द्रा"- द फॅमिली शॉपिंग मॉल ला सहकुटुंब खरेदीला येताना दिसत आहे. यात प्रामुख्याने सोलापूर शहर व परिसरातील



ग्राहक असून महत्त्वाचे म्हणजे लातूर आणि धाराशिव येथील देखील ग्राहक मोठ्या प्रमाणावर खरेदी करिता भेट देत असल्याचे त्यांनी सांगितले.

याचे कारण सांगताना ते म्हणाले की सोलापुरातील सर्वात मोठे फॅमिली फॅशन मॉल असून लेडीज , जेंट्स, किड्स आणि होम फर्निशिंग साठी स्वतंत्र विभाग व नवनवीन ड्रेसच्या असंख्य व्हरायटीज आमच्या या मॉलमध्ये उपलब्ध आहेत असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना म्हणाले की पैठणी, लेटेस्ट पार्टी वेअर साड्या,फॅन्सी डिझाईनर साड्या,फॅन्सी ड्रेस, ड्रेस मटेरिअल,वेडिंग ड्रेस, डिझाईनर लाचा, लेहंगा, जेन्ट्स वेअर, किड्स वेअर अशा विविध अंगी कपडे सर्व साईज मध्ये उपलब्ध आहेत. दिवाळीनंतर येणाऱ्या लग्नसराईला लग्नाचा बस्ता खरेदी करण्यासाठी ग्राहक येत असतात परंतु दिवाळीच्या निमित्य साधून आजच याची खरेदी भरपूर प्रमाणात होताना दिसत आहे. कारण व्हरायटीज भरपूर उपलब्ध असून थेट होलसेल दरात मिळत असल्याने ग्राहक खरेदी करिता मोठ्या प्रमाणात गर्दी करीत आहेत. आपल्या आवडीची साडी कपडे कुटुंबासाठी खरेदी करण्यासाठी सोलापूर शहर व परिसरातील आर्द्रा द फॅमिली शॉपिंग मॉल ला एक वेळा अवश्य भेट द्यावे तसेच ग्राहकांनी काही माहिती हवे असल्यास 9270413002 या मोबाईल क्रमांक वर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांची दिवाळी केली गोड

नगरसेवक किसन जाधव आणि ईच्छा भगवंताची परिवाराचा स्तुत्य उपक्रम!

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्याच्या उद्देशाने अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. प्रभाग क्रमांक २२ चे भाजपा नगरसेवक किसन जाधव आणि ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने अक्कलकोट शहरातील कोळी वस्ती गोल चौक येथे २०० गरजू शेतकरी, शेतमजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना दिवाळी फराळ किटचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून गरजवंतांच्या घरात आनंदाचा दिवा पेटविण्याचा हा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरला दिवाळीच्या पहिल्या दिवशी वसुबारसेनिमित्त शिवपुरी येथील स्वामी शिवानंद योगेंद्र गोवंश केंद्रात गाय व वासराचे विधिवत पूजन करून गोवंशासाठी चारा वाटप करण्यात आले. त्यानंतर कोळी वस्ती गोल चौक येथे फराळ



किटचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना नगरसेवक किसन जाधव यांनी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. ते म्हणाले, अक्कलकोट नगरीचा विकास ही केवळ घोषणा नसून प्रत्यक्ष कामातून दिसणारी वस्तुस्थिती आहे. देशभरातून लाखो भाविक श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी अक्कलकोटमध्ये येतात. अशा पवित्र नगरीला सुंदर, विकसित आणि आधुनिक स्वरूप देण्यासाठी सचिनदादा सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळे अक्कलकोटचा चेहरामोहरा बदलत असून, त्यांच्या विकासाभिमुख कार्याला मनापासून सलाम! त्यांनी आमदारपदावरून नामदारपदापर्यंत झेप घ्यावी, हीच आमची मनःपूर्वक सदिच्छा आहे.

तसेच यावेळी किसन जाधव यांनी ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ महाराजांच्या चरणी नतमस्तक होत आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या दीर्घायुष्यासाठी साकडं घातलं. त्यांच्या सूचनेनुसारच गरजवंतांची दिवाळी गोड करण्याचा हा उपक्रम राबविला आहे. सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड यांनीही संकटकाळात गरजूंच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी असल्याचे सांगितले याप्रसंगी युवा नेते चेतन नागेश अण्णा गायकवाड, हिंदू धर्मरक्षक प्रथमेश पवार, सामाजिक कार्यकर्ते रुद्रय्या स्वामी, राजू ब्रदर जाधव, सिकंदर शेख, उमेश जाधव,अमोल जगताप, प्रथमेश पवार,फिरोज पठाण,हुलगप्पा शासम आदी उपस्थित होते.

भव्य शादी खाना इमारतीचे ना.राजन पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- येथील सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या एक कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या भव्य व सुसज्ज 'शादीखाना' (सांस्कृतिक भवन) इमारतीचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या वास्तूमुळे परिसरातील नागरिकांना लग्नकार्य व इतर सामाजिक कार्यक्रमांसाठी अत्यंत कमी दरात हक्काची जागा उपलब्ध झाली आहे. या इमारतीचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील यांच्या हस्ते पूजन करून कुदळ मारून करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती माजी. जी.प.सदस्य शहाजान शेख होते,

उद्घाटनप्रसंगी बोलताना मा.ना. राजन पाटील म्हणाले





महाराष्ट्र राज्य सरकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार यशवंत तात्या माने यांच्याकडे शहरातील नागरिकांसाठी शादी खाना करावा अशी मागणी मी आणि म. शौकत तलफदार यांनी लेखी मागणी केली होती. कब्रस्तान कामाच्या शुभारंभाच्या कार्यक्रमा वेळी जाहीर सभेमध्ये पण मागणी केली होती. या मागणीचा पाठपुरावा अविरत सुरू ठेवत नगरसेविका शाहिस्ता परवीन मुस्ताक शेख नगरसेविका शहनाज तलफदार यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध केला. लोकोपयोगी असलेल्या या शादी खाण्याचा शुभारंभ करण्यात आला. शादी करण्यासाठी शहरांमध्ये जागेची आवश्यकता होती. हा शादीखाना करण्यासाठी नगरसेविका शहनाज तलफदार आणि एजाज तलफदार यांनी स्वमालकीची जागा दान दिली. त्याबद्दल त्यांचे मुस्लिम समाजाच्या वतीने मनःपूर्वक आभार. **- मुस्ताक शेख,** मा. नगरसेवक

की अल्पसंख्याक आणि गरीब कुटुंबातील लग्नकार्ये खाजगी हॉलच्या महागड्या खर्चामुळे अनेकदा अडचणीत येतात. हा शादीखाना अशा कुटुंबांसाठी वरदान ठरेल.

दर्जेदार बांधकाम आणि सर्व सोयींनी युक्त अशी ही वास्तू शहराच्या वैभवात भर घालणारी आहे.

यावेळी सर्व सोयींनी सुसज्ज इमारत या नूतन शादीखान्यामध्ये विवाहासाठी भव्य हॉल, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था, आधुनिक स्वयंपाकघर, नवरदेव-नवरीसाठी सुसज्ज खोल्या आणि वाहनांसाठी मोठी पार्किंग व्यवस्था करण्यात करण्यात येणार आहे अशी माहिती मा. नगरसेवक मुस्ताक शेख यांनी दिली.

यावेळी उपनगराध्यक्ष दत्तात्रय खवळे, नगरसेविका शाहिस्ता परवीन मुस्ताक शेख, नगरसेविका शहनाज तलफदार, नगरसेवक सतीश आप्पा काळे, प्रमोद बापू डोके, कुंदन धोत्रे, अझरुद्दीन कुरेशी, संतोष सुरवसे, उद्योजक खाजाभाई शेख, श्री बरे, उद्योजक यशवंत बापू गुंड, एजाज तलफदार, हेमंत गरड,

डॉ. वसीम शेख, संतोष गायकवाड, माजी सरपंच हाजी बिलाल शेख, असलम खान, शकील शेख, अझरुद्दीन शेख, सादिक आतार, रवी डोकडे, हुजेफ शेख, मोहम्मद शेख, इत्यादी सह मोहोळ शहरातील नागरिक उपस्थित होते.

सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी पालक मेळावा उत्साहात

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर येथील जनरल सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने प्रथम वर्ष बी. टेक.च्या विद्यार्थ्यांसाठी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा. एम. के. जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत करून पालक मेळाव्याची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पालक मेळावा पार पडला.

यावेळी विभागप्रमुख डॉ. के. एस. पाटील यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये शिक्षक पालक योजना (Teacher Guardian System), वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी नियमित अभ्यास सत्रे, प्रत्येक वर्गासाठी वर्ग समन्वयकांची नियुक्ती आदी उपक्रमांचा समावेश



होता. विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती, अंतर्गत मूल्यमापनातील कामगिरी आणि शैक्षणिक प्रगती यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच डॉ. संगीता पाटील यांच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या समुपदेशन सुविधेची माहितीही दिली.

यावेळी प्रथम सत्रातील परीक्षा, युवा महोत्सव आणि क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह गौरव करण्यात आला. प्रथम वर्षातील विद्यार्थी साईश भंडारे यांची आई सौ. संघमित्रा भंडारे यांनी पालकांच्या वतीने मनोगत व्यक्त केले.

विद्यार्थी आयुष सोनी आणि स्वरा यादव यांनी महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण, प्राचार्य, विभागप्रमुख आणि शिक्षकांकडून मिळणारे मार्गदर्शन याविषयी आपले अनुभव मांडले.

प्राचार्य डॉ. एस. डी. नवले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सिंहगड संस्थेचे संशोधन संचालक तथा सीआरटीडीचे संचालक प्रा. डॉ. एस. एच. पवार यांनी बीजभाषणात विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती विकसित करण्याचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. एस. एच. क्षीरसागर यांनी केले. त्यांनी मान्यवर, पालक, विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे आभार मानले. हा पालक मेळावा जनरल सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाचे प्रा. एस. आर. कोंडा यांच्या समन्वयातून यशस्वीपणे पार पडला.

जागतिक क्रीडा क्षेत्रात बंजारा समाजाचा मानाचा तुरा !

सुयश संजय आडे यांची ऐतिहासिक कामगिरी

भव्य सत्कार सोहळ्यात कौतुकाचा वर्षाव!

धाराशिव (कटूसत्य वृत्त):- धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात असलेल्या शीगोली तांड्याचा सुपुत्र सुयश संजय आडे याने आपल्या अफाट मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि जिंकण्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात भारताचा तिरंगा अभिमानाने उंचावला आहे.

चीनमधील जिंगशान येथे आयोजित ५ व्या जागतिक ज्युनिअर सॉफ्ट टेनिस चॅम्पियनशिप २०२६ या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुयशने आपल्या असामान्य खेळाच्या जोरावर मुलांच्या १८ वर्षाखालील एकेरी गटात भारतासाठी पहिले आंतरराष्ट्रीय रौप्यपदक (सिल्व्हर मेडल) पटकावण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला. तसेच सांघिक गटात कांस्यपदक (ब्राँझ मेडल)



मिळवून भारताच्या पदकतालिकेत मोलाची भर घातली.

ही कामगिरी केवळ एका खेळाडूचे यश नाही, तर शीगोली तांडा, तुळजापूर तालुका, धाराशिव जिल्हा आणि संपूर्ण बंजारा समाजाच्या अभिमानाचा सुवर्णक्षण आहे.

ग्रामीण भागातून पुढे येत जागतिक स्तरावर आपल्या कौशल्याचा ठसा उमटवणाऱ्या सुयशने हे सिद्ध केले आहे की, परिस्थिती कोणतीही असो, मनात जिद्द, मेहनत आणि ध्येयाप्रती निष्ठा असेल तर यशाचे शिखर गाठता येते!

या अभूतपूर्व यशाबद्दल बंजारा विरासत संघ, सोलापूर व संदीप अण्णा राठोड जनसंपर्क कार्यालयाच्या वतीन सुयश संजय आडे याचा भव्य-दिव्य सत्कार करून त्याच्या यशाचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सुयशचे अभिनंदन करत त्याच्या पुढील क्रीडा प्रवासासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी अंकुश राठोड, संदीप अण्णा राठोड, प्रकाश चव्हाण, संजय राठोड, विशाल जाधव, किसन राठोड, बाबू पवार, सुमित पवार, रितेश राठोड, श्रेयस राठोड, कुणाल पवार, सुजित पवार, सुयश पवार संदेश पवार प्रशांत राठोड

निरोज पवार यांच्यासह अनेक मान्यवर व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुयश, तुज्या रॅकेटमधून निघालेला प्रत्येक फटका आज जागतिक स्तरावर आपल्या समाजाच्या सामर्थ्याची ओळख निर्माण करत आहे. तुज्या या यशाने अनेक नवोदित खेळाडूंना स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा दिली आहे.

आज तुज्या गळ्यात पडलेली पदके ही केवळ धातूची पदके नाहीत, तर तुज्या कष्टांची, संघर्षाची, आई-वडिलांच्या स्वप्नांची आणि समाजाच्या विश्वासाची अनमोल पावती आहेत!

अभिमान आहे तुझा सुयश! तुझी ही विजयाची घोडदौड अशीच सुरू राहो. उद्या जागतिक सुवर्णपदक आणि ऑलिम्पिकच्या मैदानावर भारताचा तिरंगा फडकवण्याचे तुझे स्वप्न साकार होवो, हीच मनःपूर्वक सदिच्छा!

शीगोली तांड्याचा अभिमान... धाराशिवचा स्वाभिमान... बंजारा समाजाचा जागतिक सन्मान!

हार्दिक अभिनंदन आणि उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

विद्यार्थ्यांमधील लेखन कौशल्य शिक्षकांनी विकसित करावेत- मल्लिकार्जुन मसुती

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग प्रगत होत चालले आहे, भ्रमणध्वनी, व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर, युट्युब यांचा वापर अधिक होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे लेखन कलेकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. आता त्यामध्ये ए.आय. माध्यमाची भर पडली आहे. अशा स्थितीत शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांची लेखन कला विकसित करण्याची जबाबदारी घेतली पाहिजे, असे प्रतिपादन, उद्योजक मल्लिकार्जुन मसुती यांनी केले.

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात, दिवाळी सणानिमित्त विशेष भित्ती पत्रकाचे प्रकाशन उद्योजक मसुती यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यावेळी ते बोलत होते. यावेळी, प्राचार्य डॉ.राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध आहेत पण वाचक नाहीत अशी ग्रंथालयांची अवस्था झाली आहे. विद्यार्थी



भित्तीपत्रकातून विज्ञान, टेरिफ व दुष्काळावर लेख तसेच कविता सादर

"विवेक" अंकातून विद्यार्थ्यांनी भीषण दुष्काळावर लेख लिहिले. वाणिज्य विभागाच्या "अर्थमंच" मधून ट्रम्प यांचा टेरिफ, भारत - न्यूझीलंड व्यापार करार. तर,"अग्निपंख" मधून विज्ञानाची प्रगती अधोरेखित केल्यामुळे उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

भित्तीपत्रकाची आकर्षक चित्रांनी सजावट

रंगीबेरंगी रांगोळ्याची चित्रे, पणत्या, आकाश कंदील आणि रोषणाईची आकर्षक चित्रे भित्तिपत्रकातून रेखाटली होती. शुभ दीपावली व दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा आशा संदेशानी भित्तिपत्रकाचे शीर्षक सजविण्यात आले होते.

मोबाईलच्या आहारी गेले आहेत. ही अवस्था बदलण्यासाठी शाळा महाविद्यालयातून भित्तिपत्रके साकारली पाहिजेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस आर. लोखंडे यांनी केले. भित्तिपत्रकाचा उद्देश प्रा मनीषा शिंदे यांनी कथन केले, प्राध्यापिका सोनाली कटकधोंड यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ.शितल झिंगाडे-भस्मे , डॉ बाळासाहेब पाटील. प्रा.सौरभ भस्मे, प्रा.ऐश्वर्या तारापुरे, प्रा. सौंदर्या शास्त्री प्रा. जनाबाई चौधरी, प्रा.प्राची गणेचारी, प्रा. विद्या बिराजदार उपस्थित होते.

सेवा संकल्प अभियानात माढा तालुका जिल्ह्यात प्रथम

जिल्हा स्तरावर गौरवपत्र देऊन सन्मान

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत (उमेद) राबविण्यात आलेल्या रुक्मिणीसप्ताह व सेवा संकल्प अभियान-२०२६ मध्ये माढा तालुक्याने सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षाच्या वतीने माढा तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाला गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, बचत गटांना उद्योग-व्यवसायासाठी प्रोत्साहन, कर्ज प्रस्तावांची पूर्तता, जनसमर्थ पोर्टलवरील नोंदी आणि बँकांशी समन्वय अशा विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. तालुका व प्रभागस्तरीय अधिकारी, कर्मचारी, ग्रामसंघ, प्रभागसंघ आणि महिला बचत गटांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे

कुर्डू प्रभागाचाही प्रथम क्रमांक



यश मिळाले.

या अभियानात कुर्डू प्रभागानेही जिल्हा स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला. याबद्दल प्रभाग समन्वयक नीता काळे शिंदे यांना गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

तालुका अभियान व्यवस्थापक अवधुत देशमुख यांनी या यशाचे श्रेय सर्व अधिकारी, कर्मचारी, समुदाय संवर्गातील व्यक्ती आणि महिला बचत गटांच्या सामूहिक परिश्रमांना दिले. पुरस्कार वितरण समारंभास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, जिल्हा व्यवस्थापक संतोष डोंबे, राहुल जाधव यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

या यशाबद्दल गटविकास अधिकारी महेश सुळे, पंचायत समिती सभापती पंडित देशमुख, उपसभापती स्वाती गिड्डे आणि गटनेते डॉ. आशिष राजपूत यांनी माढा तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाचे अभिनंदन केले.

पालघर येथील राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत ब्रह्म स्पोर्ट्सचे घवघवीत यश

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने पालघर येथे आयोजित शालेय राज्यस्तरीय मैदानी स्पर्धा २०२६-२७ मध्ये ब्रह्म स्पोर्ट्स क्लबच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे.

या स्पर्धेमध्ये १७ वर्षाखालील मुलींच्या गटातील ३ किलोमीटर चालण्याच्या स्पर्धेत संजना रमेश कोळी हिने द्वितीय क्रमांक पटकावला, तर १७ वर्षाखालील मुलांच्या गटातील ५ किलोमीटर चालण्याच्या स्पर्धेत अरमान अशपाक शेख याने द्वितीय क्रमांक मिळवला. विशेष म्हणजे, हे दोन्ही खेळाडू कुमठे ज्युनिअर कॉलेज, कुमठे येथील विद्यार्थी असून त्यांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर मध्य प्रदेश येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात स्थान मिळवले आहे. त्यामुळे ब्रह्म स्पोर्ट्स क्लब व कुमठे ज्युनिअर कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीपराव माने, सोलापूर महानगरपालिकेचे नगरसेवक



तथा संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने आणि संस्थेच्या विश्वस्त प्रा. स्वातीताई माने यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच कुमठे ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख संजय जाधव, दीपक शिंदे, संजय घोडके, प्रशालेचे मुख्याध्यापक अंबादास रेडे व क्षीरसागर यांनीही दोन्ही खेळाडूंचे विशेष अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या खेळाडूंना राष्ट्रीय खेळाडू व NIS प्रशिक्षक विक्रम पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सातत्यपूर्ण सरावामुळे आणि योग्य मार्गदर्शनामुळे खेळाडूंनी राज्यस्तरावर यश संपादन करून राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत मजल मारली आहे. या यशामुळे ब्रह्म स्पोर्ट्स क्लब, कुमठे ज्युनिअर कॉलेज, पालकवर्ग आणि संपूर्ण कुमठे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.